


दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : २६५ वा शुक्रवार दि ०२ जानेवारी २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# ठाकरे बंधूंमधील सुटला तिढा,पण मुंबईतील एकाच जागेवर होणार लढा...

## दोघेही घेईनात माघार, असे कोण हे उमेदवार?

**वृत्तसंस्था/मुंबई**

मुंबई महापालिकेसाठी ठाकरे बंधूंमध्ये युती झाली असली, तरी वॉर्ड क्रमांक ६७ मध्ये उद्धव ठाकरे यांची शिवसेना उबाठा आणि राज ठाकरे यांच्या मनसे अशा दोन्ही पक्षांतील उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. युती झाली, तर या जागेचा तिढा का सुटला नाही, असा प्रश्न विचारला जात आहे. एखादा पक्ष माघार घेणार की मैत्रीपूर्ण लढत होणार, हे आज, अर्जमाघारीच्या अखेरच्या दिवशी समजणार आहे. राज्यात पहिल्यांदाच मनसे आणि शिवसेना उबाठा पक्षात युती झाल्याने मुंबईत नेमका कोणाच्या बाजूने कौल मिळणार, याची उत्सुकता आहे. अशातच अंधेरी पश्चिम, प्रभाग क्रमांक ६७ मधून मनसेने कुशल धुरी यांना मैदानात उतरवले आहे, तर उद्धव ठाकरे यांच्याकडून शरद जाधव यांना उमेदवारी दिली आहे. या वॉर्डातून या दोन्ही पक्षांच्या उमेदवारांनी अधिकृत अर्ज भरल्याची माहिती पुढे आली असून उमेदवारी अर्जाच्या छाननी प्रक्रियेनंतर मुंबई महानगरपालिकेकडून याबाबत माहिती देण्यात आली आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची आज, शुक्रवार २ जानेवारी ही शेवटची मुदत आहे. जागावाटपात ज्या पक्षाच्या वाट्याला ही जागा आली, त्या पक्षाचा उमेदवार कायम राहिल आणि दुसऱ्या उमेदवाराला माघार घ्यावी लागेल, असे सरळसरळ चित्र आहे. मात्र, उमेदवारी मागे घेतली जाते की, मैत्रीपूर्ण लढत होते, हे शुक्रवारीच समजणार आहे. प्रभाग क्रमांक ६७ मध्ये एकूण १२ उमेदवार रिंगणात आहेत. भाजपने दीपक कोतेकर यांना उमेदवारी दिली असून समाजवादी पक्षाकडून प्रकाश कोकरे, वंचित बहुजन आघाडीकडून पीर मोहम्मद शेख यांना तिकीट मिळाले आहे. त्यामुळे मनसे, ठाकरे गट, शिवसेना-भाजप आणि वंचित-काँग्रेस यांच्यात प्रमुख लढत होणार आहे. आता इथे कोण बाजी मारणार याकडे राजकीय वर्तुळाचं लक्ष लागून राहिलं आहे. दरम्यान, मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी शिवसेना



(उबाठा) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या संयुक्त जाहिरनाम्याला अंतिम स्वरूप देण्यासाठी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांची गुरुवारी ङ्गशिवतीर्थफ्वर बैठक झाली. यावेळी दोन्ही पक्षांतील बंडखोरी आणि पदाधिकाऱ्यांमधील नाराजीबाबतही चर्चा करण्यात आल्याचे समजते. या बैठकीपूर्वी मनसेचे सर्व उमेदवार राज ठाकरे यांच्या भेटीसाठी आले होते. यावेळी सर्व उमेदवारांचे राज ठाकरे यांच्या पत्नीकडून औक्षण करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

# खडकपूर्णा सिंचन प्रकल्पात मोठा घोटाळा उघड! बनावट अनुभव प्रमाणपत्रांवर ७.८८ कोटींचे काम लाटले..

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील खडकपूर्णा उपसा सिंचन योजना टप्पा क्र. २ मध्ये तब्बल ७ कोटी ८७ लाख रुपयांचा जलसिंचन गैरव्यवहार उघडकीस आला असून, यामुळे प्रशासकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने जनहित याचिकांवर (क्र. ९२/२०१२ व ८३/२०१२) दिलेल्या आदेशानंतर झालेल्या उघड चौकशीत हा धक्कादायक भ्रष्टाचाराचा प्रकार समोर आला आहे. मे. शेठ ॲन्ड सुरा इंजिनिअरिंग प्रा. लि., पुणे या कंपनीने निविदा मिळवण्यासाठी दोन बनावट पूर्व अनुभव प्रमाणपत्रे सादर केल्याचे निष्पन्न झाले आहे. कंपनीचे कार्यकारी संचालक विवेक मदनभाई सुरा यांनी निविदेच्या पूर्व अर्हता टप्प्यात पात्र ठरण्यासाठी ही बनावट कागदपत्रे वापरल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. चौकशीत आढळले की, प्रत्यक्ष केलेल्या कामाच्या रकमेपेक्षा अनेक पटींनी वाढवून आकडे दाखवण्यात आले, जे सरळसरळ फसवणूक आणि दस्तऐवज बनावट करण्याचा गुन्हा आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, परभणी व जळगाव विभागांकडून करण्यात आलेल्या पडताळणीत प्रमाणपत्रांतील रकमेतील तफावत स्पष्ट झाली आहे. एका कामात प्रत्यक्ष ७३.४४ लाखांचे काम असताना तब्बल ३४८.७४ लाख रुपये दाखवण्यात आल्याचे समोर आले. ही बाब म्हणजे सरकारी यंत्रणेच्या डोळ्यात धूळफेक करून कोट्यवधींचे काम हडप करण्याचा प्रयत्न असल्याचे स्पष्ट होते. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम येथील पोलीस निरीक्षक बालाजी तिप्पलवाड यांनी सरकारतर्फे फिर्याद दाखल करत भा.दं. वि. कलम ४६५, ४६६, ४७१ अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे. हा प्रकार म्हणजे जलसंपदेला लागलेला भ्रष्टाचाराचा



कर्करोग असून, दोषींवर कठोर कारवाई झालीच पाहिजे, अशी जोरदार मागणी आता जनतेतून होत आहे.

# तेलाची निसरडी वाट...



अशक्यप्राय दावे करण्यात किंवा आत्मविश्वासाने कोणत्याही गोष्टीचे सुलभीकरण करण्यात अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना कोणीही हरवू शकत नाही. गेल्या वर्षीच्या निवडणुकीच्या प्रचारात त्यांनी सत्तेवर आल्यानंतर रशिया आणि युक्रेनमधील युद्ध २४ तासांत संपवू, असा दावा केला होता. सत्तेवर येऊन दहा महिन्यांहून अधिक काळ लोटला तरी ट्रम्प यांना हे युद्ध थांबवता आलेले नाही. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन हे अमेरिकेच्या अटी-शर्तींवर युद्धविराम करण्यास तयार नाहीत; ते आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. चर्चेतून मार्ग निघत नसल्याने, ट्रम्प यांनी रोझनेफ्ट आणि ल्युकॉइल या प्रमुख रशियन तेल कंपन्यांवर ऑक्टोबरमध्ये निर्बंध लादले. रशियाची अर्थव्यवस्था तेल आणि गॅस निर्यातीवर अवलंबून असल्याने, हे निर्बंध रशियाला कमकुवत करून युद्धविरामासाठी राजी करतील, अशी ट्रम्प यांना आशा आहे. अमेरिकेचे माजी अध्यक्ष जो बायडेन यांच्यापेक्षा आपण वेगळे आहोत हे दाखवण्याचा ट्रम्प नेहमी प्रयत्न करतात. मात्र, यापूर्वी बायडेन यांनी वापरलेले निर्बंधाचे शस्त्रच ट्रम्प आता वापरत आहेत. आजवरचा निर्बंधांचा इतिहास पाहिल्यास, निर्बंधांमुळे अपेक्षित परिणाम होतोच, असे दिसत नाही. इराण, इराक, व्हेनेझुएला, रशिया हे देश खनिज तेलाच्या निर्यातीवर अवलंबून आहेत; परंतु अमेरिका आणि पाश्चात्त्य राष्ट्रांनी निर्बंध लादल्यानंतरही त्यांची निर्यात पूर्णपणे ठप्प झालेली नाही. या देशांनी निर्यातीची पर्यायी व्यवस्था उभी केल्यामुळे निर्बंधांचा अपेक्षित परिणाम साधला गेलेला नाही. अमेरिकेने रशियन तेल कंपन्यांवर घातलेल्या नवीन निर्बंधांमुळे भारतीय तेल कंपन्यांसमोर अचानक मोठी अडचण उभी राहिली आहे. या वर्षातील पहिल्या नऊ महिन्यांत भारताने रशियाकडून दररोज १.९ दशलक्ष बॅरल तेल खरेदी केले, जे रशियाच्या एकूण निर्यातीच्या जवळपास ४० टक्के होते. भारतातील सरकारी तेल शुद्धीकरण कंपन्या रोझनेफ्ट आणि ल्युकॉइल यांच्याकडून थेट तेल खरेदी न करता, मध्यस्थांमार्फत खरेदी करतात. रशियन तेलाचा व्यापार सुकर व्हावा म्हणून दुबई आणि सिंगापूरमध्ये अनेक तृतीय-पक्ष व्यापारी कंपन्या (थर्ड पार्टी ट्रेडर्स) तयार झाल्या आहेत. यापूर्वी अमेरिकेने लादलेले निर्बंध पाळतही कंपन्यांना तेल आयात करणे यामुळे शक्य झाले होते. रशिया तेल निर्यात करताना किमतीत सूट देत असल्याने, सरकारी कंपन्या आणि रिलायन्ससारख्या खासगी कंपन्या मोठ्या आनंदाने तेल विकत घेत होत्या. काही वर्षांपूर्वी प्रति बॅरल २० डॉलरपर्यंत मिळणारी सूट जागतिक बाजारातील तेलाचे दर कमी होताच कमी झाली. मात्र, ही सूट मिळत असल्याने भारतीय तेल कंपन्यांच्या नफ्यात वाढ झाली. युक्रेनमधील युद्धापूर्वी भारताच्या एकूण तेल आयातीत रशियाचा वाटा दोन टक्क्यांपेक्षा कमी होता, तो आता वाढून सुमारे ३५ टक्के झाला आहे. अमेरिकेच्या नवीन निर्बंधांमुळे आता भारतीय आयातदारांना या दोन रशियन कंपन्यांकडून खरेदी थांबवण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. रशियातून भारतात येणारे जवळपास सर्वच तेल याच दोन कंपन्यांकडून येते, त्यामुळे आगामी काळात रशियाकडून होणारी आयात मोठ्या प्रमाणात कमी होईल. रशियाकडून होणारी आयात कमी झाली किंवा बंद झाली तरी भारतात तेलाचा तुटवडा निर्माण होणार नाही, कारण जागतिक बाजारात तेलाचे अतिरिक्त उत्पादन होत आहे. ङ्गओपेकफ संघटना आणि इतर उत्पादक देश रशियाची पोकळी सहज भरून काढतील. मात्र, ट्रम्प यांचा आग्रह आहे की भारताने अमेरिकेकडून तेल आयात वाढवावी. एकेकाळी अमेरिका जगातील सर्वांत मोठा खनिज तेल आयातदार होता. मात्र, गेल्या दोन दशकांत शेल तंत्रज्ञानामुळे अमेरिकेचे तेल आणि गॅसचे उत्पादन वेगाने वाढले आणि पाच वर्षांपूर्वी अमेरिका निर्यातदार बनला. सध्या अमेरिका जगातील सर्वांत मोठा तेल उत्पादक आहे. ट्रम्प यांना निवडणुकीच्या प्रचारासाठी तेल कंपन्यांनी सढळ हाताने मदत केली होती आणि या कंपन्यांचे हित अमेरिकेतून वाढत्या निर्यातीत आणि जागतिक बाजारात तेलाचे दर चढे राहण्यात आहे. अमेरिकेमध्ये खनिज तेलाच्या मागणीतील वाढ मंदावली आहे आणि इलेक्ट्रिक वाहनांमुळे त्यात वाढ होण्याची शक्यताही नाही. अशा परिस्थितीत अमेरिकेला एक हक्काचा ग्राहक हवा आहे. सध्या जगामध्ये खनिज तेलाच्या मागणीत सर्वाधिक वाढ भारतात होत आहे. खनिज तेलाच्या बाबतीत आपण जगातील तिसरी मोठी बाजारपेठ आहोत. त्यामुळे हा ग्राहक मिळवण्यासाठी अमेरिका व्यापार करार आणि निर्बंधांच्या माध्यमातून भारतावर दबाव टाकत आहे. जर आपण अमेरिकेकडून खनिज तेलाची आयात वाढवली, तर साहजिकच अमेरिकेची भारतासोबतची व्यापार तूट कमी होऊन द्विपक्षीय व्यापार करार करणे सोपे होईल.






*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# संघ मुख्यालयाच्या उंबरठ्यावरच भाजपला आव्हान! २५ वर्षांच्या तरुण स्वयंसेवकाचे बंड

**नागपूर :** नागपूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत अनेक प्रभागांमध्ये सत्तासमीकरणे बदलताना दिसत असली, तरी प्रभाग क्रमांक २२ विशेष चर्चेत आला आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय असलेला हा प्रभाग भाजपसाठी परंपरेने सुरक्षित आणि प्रतिष्ठेचा मानला जातो. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्यासह संघाचे अनेक वरिष्ठ पदाधिकारी याच प्रभागातील मतदार असल्याने या प्रभागाकडे राज्यभराचे लक्ष असते. मात्र यंदा याच संघभूमीतून पारंपरिक राजकीय चौकटीबाहेरचा एक वेगळा सूर उमटताना दिसत आहे.




अवघ्या पंचवीस वर्षांचा तरुण स्वयंसेवक निनाद दीक्षित नागरिक समितीच्या माध्यमातून निवडणुकीच्या मैदानात उतरला असून तो नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या फॉरवर्ड ब्लॉक पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढवत आहे. संघाच्या पार्श्वभूमीचा संदर्भ असलेल्या प्रभागात थेट सत्ताधारी पक्षासह सर्वच राजकीय पक्षांना सवाल करणारी ही उमेदवारी अनेक अर्थांनी लक्षवेधी ठरली आहे. संघाच्या विचारांशी जोडल्या गेलेल्या प्रभागात एका तरुण स्वयंसेवकाने व्यवस्थेविरोधातील भूमिका घेणे, हा केवळ राजकीय प्रयोग नसून संघभूमीतून निर्माण झालेल्या वैचारिक प्रश्नांचा आवाज म्हणूनही पाहिला जात आहे.निनाद दीक्षित कोणत्याही मोठ्या पक्षाचा अधिकृत उमेदवार नसून, 'नागरिक समिती'च्या माध्यमातून तो ही लढाई लढवत आहे. संघाकडून अधिकृत पाठिंब्याचा तो दावा करत नसला, तरी संघातील अनेक स्वयंसेवक वैयक्तिक पातळीवर आपल्याशी सहमत असल्याचे तो सूचकपणे सांगतो. संघ मुख्यालय असलेल्या प्रभागात विकास झाला असला, तरी तो केवळ पायाभूत कामांपुरता मर्यादित राहिल्याचा त्याचा आरोप आहे. ङ्गरस्ते, टाईल्स आणि सिमेंटची कामं झाली, पण सामाजिक पायाभूत सुविधा, आरोग्य, स्वच्छता आणि नागरिकांच्या दैनंदिन अडचणींकडे दुर्लक्ष झालं,ङ्ग असा त्याचा थेट सवाल आहे. संघ नेहमीच समाजघटकांमध्ये स्वयंप्रेरणा, नागरिकत्वाची जाणीव आणि सामाजिक जबाबदारीवर भर देतो. त्या पार्श्वभूमीवर निनाद दीक्षितचा दावा आहे की, आपली लढाई ही कोणत्याही एका पक्षाविरोधात नसून व्यवस्थेतील निष्क्रियतेविरोधात आहे. तरुणांना राजकारणात संधी न मिळण्याचा मुद्दाही तो सातत्याने मांडतो. महाराष्ट्रात महाविद्यालयीन निवडणुका बंद असल्याने तरुणांची राजकीय घडणच खुंटत असल्याचे त्याचे मत आहे.संघ मुख्यालयाच्या प्रभागात उभा राहिलेला हा तरुण स्वयंसेवकांचा सवाल भाजप–काँग्रेसच्या चौकटीपलीकडे जाऊन नव्या चर्चेला सुरुवात करून गेला आहे.

## भाजपनं उमेदवारी नाकारताच शिल्पाताईची भलतीच युक्ती

**मुंबई :** मुंबईसह २९ महापालिकांच्या निवडणुकांसाठी १५ जानेवारीला मतदान होत आहे. १६ जानेवारीला मतमोजणी होऊन निकाल जाहीर होतील. उमेदवारी निश्चित झाल्यावर सगळ्याच पक्षांमध्ये बंडखोरी झाल्याचं दिसून आलं. निष्ठावंतांना डावलण्यात आल्याचे प्रकार जवळपास सगळ्याच पक्षांमध्ये घडले. एबी फॉर्मसाठी इच्छुक उमेदवार अगदी शेवटच्या क्षणांपर्यंत ताटकळत होते. एबी फॉर्मसाठी काहींनी नेत्यांच्या गाड्यांचा पाठलाग केला. उमेदवारी न मिळाल्यानं आपल्याच पक्षाच्या मंत्र्यांच्या गाड्यांना काळं फासण्याचे प्रकार घडले. तर मुंबईत भाजपच्या एका इच्छुकानं उमेदवारी मिळवण्यासाठी चक्क बोगस एबी फॉर्म जोडला.मुंबईच्या प्रभाग क्रमांक १७३ मधील शिल्पा केळुसकर यांना भाजपमधून उमेदवारी हवी होती. ण त्यांना पक्षानं संधी दिली नाही. त्यामुळे त्यांनी थेट बनावट एबी फॉर्मचा वापर करत निवडणूक आयोगाकडे उमेदवारी अर्ज दाखल केला. आश्चर्याची बाब म्हणजे आयोगानं हा अर्ज वैध ठरवला. शिल्पा केळुसकर



यांचा अर्ज वैध ठरताच त्यांचे पती दत्ता केळुसकर नॉट रिचेबल झाले आहे. त्यामुळे भाजपची गोची झाली आहे.युतीच्या जागावाटपात प्रभाग क्रमांक १७३ शिंदेसेनेला गेला आहे. शिंदेसेनेनं माजी नगरसेवक रामदास कांबळे यांच्या पत्नी पूजा कांबळे यांना संधी दिली आहे. पण भाजपच्या शिल्पा केळुसकर यांनी बनावट एबी फॉर्मच्या आधारे अर्ज भरला आहे. यासंदर्भात भाजपनं निवडणूक आयोगानं तक्रार दाखल केली आहे. केळुसकर यांचा अर्ज माघारी घेण्यासाठी भाजपकडून प्रयत्न सुरु आहेत.मुंबई भाजपचे अध्यक्ष अमित साटम यांच्या कानावर हा प्रकार गेल्यानंतर त्यांनी याबद्दल निवडणूक आयोगाला तातडीनं पत्र दिलं. शिल्पा केळुसकर यांचा उमेदवारी अर्ज बाद करण्याची मागणी त्यांनी पत्रातून केली.

## आता युती म्हणजे थेट डोकेफोडी : शिरसाट

**छत्रपती संभाजीनगर :** 'राज्यात महायुतीचे जागावाटप आणि समन्वय ज्या पद्धतीने व्हायला हवा होता, तसा तो काही ठिकाणी झालेला नाही,' अशी कबुली शिंदेंच्या शिवसेनेचे प्रवक्ते आमदार आणि मंत्री संजय शिरसाट यांनी आज येथे दिली. 'आता या वळणावर पुन्हा मनोमिलन करून उमेदवार मागे घेणे अशक्य आहे, तरीही मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यासाठी प्रयत्न करत आहेत,' असेही त्यांनी स्पष्ट केले. छत्रपती संभाजीनगरमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत संजय शिरसाट यांनी महायुतीतील नाराजी, मुंबईतील राजकारण आणि ठाकरे गटावर जोरदार प्रहार केला, त्यावेळी ते बोलत होते. संभाजीनगरमधील स्थानिक युतीबाबत बोलताना शिरसाट यांनी अत्यंत कडक भूमिका मांडली. ते म्हणाले, 'येथे आता युती पूर्णपणे तुटली आहे. या परिस्थितीत पुन्हा युती करण्याचा प्रयत्न केला तर कार्यकर्त्यांमध्ये 'डोकेफोडी' होईल. स्थानिक नेत्यांनी आणि भाजपने ही युती तोडण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले आहेत.' यावेळी त्यांनी काही कागदपत्रांचे पुरावे देखील माध्यमांना दाखवले.

## कल्याणमध्ये प्रभाग २४ मध्ये विरोधक गारद, ३ उमेदवार बिनविरोध

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत प्रभाग क्रमांक २४ मधून रमेश म्हात्रे, विश्वनाथ राणे, वृषाली जोशी हे शिवसेनेचे तीन नगरसेवक उमेदवार बिनविरोध विजयी झाले आहे. यामुळे यांच्यासमवेत प्रभागात उभे असलेल्या भाजपच्या ज्योती पाटील देखील विजयी झाल्या आहेत. कल्याण डोंबिवलीत महायुतीचा शतप्रतिशत महापौर बसणार अशी चर्चा राजकीय वतुळात होत आहे. तर येत्या दोन दिवसात इतर काही प्रभागात ही शिवसेनेचे काही उमेदवार बिनविरोध निवडून येण्याची दाट शक्यता वर्तविली जात आहे.कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. २४ मधील निवडणूक निकालांनी स्थानिक राजकारणात शिवसेनेचे स्थान अधिक भक्कम केले आहे.

या प्रभागात शिवसेनेचे तीन उमेदवार बिनविरोध निवडून आले असून भारतीय जनता पक्षाचा एक उमेदवार विजयी झाला आहे.तिन्ही जागांवर प्रतिस्पर्धी उमेदवारांनी माघार घेतल्याने शिवसेनेला मिळालेला




हा तिहेरी बिनविरोध विजय पक्षाच्या संघटनात्मक ताकदीचा आणि शिवसेनेवर असलेल्या जनतेच्या विश्वासाचा विजय असल्याचे बोलले जात आहे. तर या तिन्ही नगरसेवकांचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्याकडून अभिनंदन करण्यात आले आहे.शिवसेनेकडून प्रभागातील गटबाजी आटोक्यात ठेवत स्थानिक पातळीवरील समन्वय, संवाद आणि संघटनशक्ती या घटकांचा या निकालात महत्त्वाचा वाटा असल्याची चर्चा राजकीय वतुळात सुरू आहे. या तिन्ही जागांवर शिवसेनेचा बिनविरोध विजय म्हणजे या भागातील सत्तेचे समीकरण मोठ्या प्रमाणात शिवसेनेच्या बाजूने झुकल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

## ठाकरे बंधूंचा उमेदवारच नाही ; किरीटभाई म्हणतात, देवाची लीला अगाध

**मुंबई :** मुंबईसह २९ महापालिकांसाठी १५ जानेवारीला मतदान होणार आहे. काल सगळ्याच ठिकाणी उमेदवारांच्या अर्जांच्या छाननीची प्रक्रिया पूर्ण झाली. त्यामुळे आता लवकरच प्रचाराला सुरुवात होईल. १६ जानेवारीला मतमोजणी होऊन निकाल जाहीर करण्यात येईल. मुंबईत ठाकरे बंधू विरुद्ध महायुती विरुद्ध काँग्रेस–वंचित आघाडी अशी तिहेरी लढत होत आहे. अनेक बड्या नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागलेली असताना दुसरीकडे भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांना मोठा दिलासा मिळाला आहे. त्यांचे पुत्र नील यांचा विजय जवळपास निश्चित झाला आहे. नील सोमय्या प्रभाग क्रमांक १०७ मधून




निवडणूक लढत आहेत.भाजप नेते किरीट सोमय्या यांनी गुरुवारी एक्सवर एक पोस्ट केली आहे. त्यात त्यांनी नील सोमय्या लढत असलेल्या प्रभाग क्रमांक १०७ मधील सद्यस्थितीची माहिती दिली आहे. 'नील सोमय्या प्रभाग क्रमांक १०७ मधून निवडणूक लढत आहेत. या प्रभागात ठाकरेसेना, मनसे, काँग्रेस, शरद पवारांची राष्ट्रवादी यांच्यापैकी कोणाचाही उमेदवार नाही. देवाची लीला अगाध आहे,' असं सोमय्या यांनी पोस्टमध्ये नमूद केलं आहे. या पोस्टमध्ये त्यांनी भाजप, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि नील सोमय्या यांना टॅग केलं आहे.नील सोमय्या २०१७ मध्ये पहिल्यांदा प्रभाग क्रमांक १०७ मधून विजयी झाले. आता ते दुसऱ्यांदा निवडणुकीच्या रिंगणात आहेत. मुलुंड हा भाजपचा बालेकिल्ला मानला जातो. या परिसरात गुजराती आणि मारवाडी मतदारांची संख्या लक्षणीय आहे. हा मतदार भाजपचा समर्थक मानला जातो. त्यामुळे सोमय्या यांच्या विजयाची शक्यता अधिक आहे. मुंबईत ठाकरे बंधू आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची युती आहे. प्रभाग क्रमांक १०७ मधून शरद पवारांच्या पक्षानं हंसराज दनानी यांना तिकीट दिलं होतं. पण दनानी यांनी उमेदवारी अर्जासोबत प्रतिज्ञापत्रच जोडलं नसल्यानं निवडणूक आयोगानं त्यांचा अर्ज बाद केला.प्रभागातील प्रमुख उमेदवाराचा अर्जच बाद झाल्यानं नील सोमय्या यांचा रस्ता मोकळा झाला आहे. त्यांचा विजय जवळपास निश्चित मानला जात आहे. या प्रभागात वंचित बहुजन आघाडीसह अन्य ९ अपक्ष उमेदवार रिंगणात आहेत. प्रभाग क्रमांक १०७ मध्ये असलेली भाजपची ताकद पाहता सोमय्या यांच्यापुढे आता फारसं आव्हान उरलेलं नाही. आता केवळ मतदानाची औपचारिकता उरलेली आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मध्यरात्री तरुण दाम्पत्याची विहिरीत बॉडी, मुलांचा आक्रोश, पोटचे तिघं लेकरं अनाथ; नाशिक हळहळलं

**नाशिक :** नाशिक तालुक्यातील थेटाळे येथे सोमवारी दि. २९ डिसेंबरच्या मध्यरात्रीच्या सुमारास विहिरीत तरुण पती-पत्नीचा मृतदेह आढळला. सोमवारी रात्री साडेअकराच्या सुमारास शेत गट क्रमांक ११४ मधील विहिरीत योगेश भाऊसाहेब शिंदे (वय ३५) व पत्नी सोनाली योगेश शिंदे (वय ३२) यांचे मृतदेह आढळून आले. लासलगावचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे व उपनिरीक्षक किरण साळुंखे यांनी घटनास्थळी धाव घेतली. लासलगाव ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. अमोल राठोड यांनी तपासणीअंती दोघांनाही मृत घोषित केले. याबाबत लासलगाव पोलीस अधिक तपास करीत आहेत. माता-





पित्यांच्या मृत्यूमुळे त्यांची तीन अपत्ये अनाथ झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.नाशिक-पुणे महामार्गावरील मोहदरी घाटात काल बुधवारी सकाळी तीन वाहनांच्या झालेल्या भीषण अपघातात आयटी अभियंता तसेच नाशिक येथील भाजीपाला व्यापाऱ्यासह तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. येवल्याजवळ झालेल्या दोन विविध अपघातांत तरुणासह महिलेचा मृत्यू झालामूळचे केलवड (ता. राहाता) येथील रहिवासी असलेले बाळासाहेब बाजीराव व्यापारी (वय ४२, हल्ली रा. महालेफार्म, सिडको, नाशिक) हे सकाळी साडेनऊच्या सुमारास भाजीपाला खरेदीसाठी महिंद्रा पिकअप (एम. एच. १५, जी. व्ही. ७१४९) घेऊन सिन्नरमार्गे राहात्याकडे निघाले होते. त्यांच्यासोबत नातेवाइक अवधूत रामनाथ निमळे (वय २३, रा. पिंप्री निमळे, ता. राहाता, जि. अहिल्यानगर) हाही गावी जाण्यासाठी सोबत होता.सकाळी सुमारे सव्वादहाच्या सुमारास मोहदरी घाटात सिन्नरकडून नाशिकच्या दिशेने येणाऱ्या टाटा कंटेनरचा (एम. एच. ४६, ए. आर. २७२५) चालकाचा ताबा सुटल्याने कंटेनर दुभाजक ओलांडून नाशिककडील लेनवर उलटला. त्याचवेळी नाशिककडून सिन्नरकडे येणाऱ्या पिकअप वाहनाला कंटेनरने जोरदार धडक दिली.

याच दरम्यान नाशिककडून सिन्नरकडे येणारी दुचाकीदेखील (एम. एच. १५, सी. बी. ६७९६) कंटेनरच्या तडाख्यात सापडली. अपघातानंतर कंटेनर व पिकअप दोन्ही वाहने उलटली, तर दुचाकीस्वार शाजी फर्नांडो (वय ५०, रा. उपनगर, नाशिक) कंटेनरखाली दबले गेले. अपघातात व्यापारी, निमळे आणि फर्नांडो यांचा जागीच मृत्यू झाला.

## पुण्यात साखळी बॉम्बस्फोटातील आरोपी बंटी जहागीरदारला संपवलं

**अहिल्यानगर :** अहिल्यानगरमधील श्रीरामपूर शहरात काल भरदिवसा झालेल्या थरारक गोळीबाराच्या घटनेनं प्रचंड खळबळ उडाली. शहरातील बंटी हाजी जहागीरदार याच्यावर काल दुपारी दोन अज्ञात हल्लेखोरांनी गोळ्या झाडल्या. तीन गोळ्या लागल्यानं बंटी हाजी जहागीरदार गंभीर जखमी झाला होता. त्यांना तातडीने श्रीरामपूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र, त्याची प्रकृती नाजूक असल्यानं जिल्ह्यातील खासगी रुग्णालयात हलविण्यात आलं असता उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. ही घटना श्रीरामपूर येथील गरीब नवाज कब्रस्तानासमोर घडली. घटनेनंतर शहरात भीतीचं वातावरण पसरलं असून पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला आहे. दरम्यान, या गोळीबारातील दोन्ही संशयित आरोपी सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्याने तपासाला मोठी दिशा मिळाली आहे. तसेच या गोळीबाराचे सीसीटीव्ही फुटेज देखील समोर आले आहेत.या घटनेतील समोर आलेल्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये दोघे तरुण कॉलेज रोडच्या दिशेने दुचाकीवरून येताना स्पष्ट दिसत आहेत. दुचाकी चालवणारा तरुण पांढऱ्या रंगाच्या शर्टमध्ये असून, मागे बसलेला तरुण लाल रंगाच्या शर्टमध्ये आहे. शहर पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनीही आरोपी सीसीटीव्हीत कैद झाल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथकं सक्रिय झाली असून, सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास अधिक वेगानं सुरू आहे. शहरात तणावपूर्ण शांतता असून, पुढील घडामोडींकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.बंटी जहागीरदारवर पुण्यातील डेक्कन पोलीस स्टेशनमध्ये भा.द.वि कलम ३०७, ४२७, १२०(ब)सह भारताचा स्फोटक पदार्थ कायदा कलम ३,४ व ५सह बेकायदा हालचाली प्रतिबंधक अधिनियम १६ व १८ यासारखे गुन्हे दाखल होते.सीसीटीव्ही फुटेज हाती लागल्यामुळे पोलिसांच्या तपासाला मोठा वेग मिळाला आहे. शहरातील विविध चौक, रस्ते व दुकानांवरील सीसीटीव्ही

## २२ वर्षांच्या तरुणाला मित्रांसमोरच संपवल

**सांगली :** सांगली शहर आज नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी खुनाच्या घटनेनं हादरून गेलं आहे. घरातून चालत निघालेल्या एका २२ वर्षीय तरुणावर चौघा हल्लेखोरांनी पाठलाग करून धारदार शस्त्राने वार केले. पोटात, पाठीत आणि मांडीवर वर्मी घाव बसलेल्या तरुणाचा काही क्षणात उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. विष्णू सतीश वडर (वय २२ रा. वडर कॉलनी) असं खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. घटनेची माहिती मिळताच विश्रामबाग पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली होती. पोलिसांनी संशयित हल्लेखोर आर्यन पाटील आणि विष्णू वडर यांच्या शोधासाठी पथके रवाना केली आहेत.मृत विष्णू वडर आणि संशयित हल्लेखोर आर्यन पाटील, विष्णू वडर हे एकमेकांच्या ओळखीचे आहेत. संशयितांमध्ये काही महिन्यांपूर्वी वाद झाला होता. आज विष्णू धोत्रे या त्याच्या मित्रांसोबत सांगली शहरातील कॉलेज कॉर्नर परिसरातील जीए कॉलेज समोरून निघाला होता. यावेळी संशयित पाटील आणि वडर यांच्यासह अज्ञात हल्लेखोरांनी धारदार शस्त्राने त्याच्यावर हल्ला केला.

## तरुणाला घाटात बोलावलं, धारदार शस्त्राने कमलेशला संपवलं



**नाशिक :** मित्रांच्या 'थर्टी फर्स्ट' पार्टीसाठी पैशांची आणि महागड्या मोबाइलची लालसा तरुणाच्या जीवावर बेतली. मोहदरी गावाच्या शिवारातील पास्ते घाटात आढळलेल्या तरुणाच्या खून प्रकरणाचा छडा लावत सिन्नर पोलिसांनी अवघ्या २४ तासांत अल्पवयीनासह एका संशयितास ताब्यात घेतलं.

३० डिसेंबर रोजी पास्ते घाटात रस्त्याच्या कडेला रक्तबंबाळ अवस्थेत एका पुरुषाचा मृतदेह आढळून आला होता. प्राथमिक तपासात धारदार शस्त्राचे वार आणि गळा आवळल्याचं स्पष्ट झालं होतं. एमआयडीसी सिन्नरचे पोलीस निरीक्षक भरत जाधव व सिन्नर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हेमंतकुमार भामरे यांनी घटनास्थळी धाव घेतली. निफाड उपविभागीय पोलीस अधिकारी कांतीलाल पाटील यांनीही घटनास्थळी भेट देत तपासाला गती दिली. कमलेशकुमार लिलाधर पटेल (वय ३०, मूळ रा. तिघरा, गोटेगाव, मध्यप्रदेश) असं त्याचं नाव असल्याचं तपासात स्पष्ट झालं. तो सध्या माळेगाव (ता. सिन्नर) येथे भाड्याच्या खोलीत राहत असून औद्योगिक वसाहतीत काम करीत होता. याप्रकरणी अरुण बाळू पदमिरे (रा. उबाडे, घोटी, ता. इगतपुरी) आणि कोनांबे येथील एका विधीसंघर्षित बालकास पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

# संतोष मामा, ती फक्त माझी आहे; अभिषेकची अरेरावी, विषय 'मामी'पर्यंत जाण्याची भीती, अखेर भलतंच घडलं..

**पाटणा :** वर्षीय अभिषेक कुमार याच्या हत्या प्रकरणात त्याचा मामाच मुख्य आरोपी असल्याचे समोर आले आहे. अभिषेक बेपत्ता असल्याची तक्रार खुद्द संतोष मामानेच पोलिसात दिली होती. मात्र तपासात संतोषचाच या गुन्ह्यात हात असल्याचे उघड झाले. प्रेमसंबंध, ब्लॅकमेलिंग आणि पैशांचा वाद यातून ही हत्या घडल्याचा प्राथमिक अंदाज आहे. संतोष मामा आणि भाचा अभिषेक या दोघांचे एकाच महिलेशी अनैतिक संबंध होते. मात्र, 'ती' फक्त माझी आहे, तिला सोडलं नाहीस तर हा विषय मामीच्या कानावर घालेन, असा इशारा भाच्याने दिल्याने संतोष मामा चवताळला.बिहार राज्यातील भागलपूर येथील संतोष कुमार याने २४ डिसेंबर रोजी नाथनगर पोलीस ठाण्यात भाचा अभिषेक बेपत्ता असल्याची लेखी तक्रार दाखल केली होती. अभिषेक २३ डिसेंबरच्या संध्याकाळपासून बेपत्ता होता. 'अभिषेक



२३ डिसेंबरला संध्याकाळी सुमारे ७.३५ वाजता बाजारात जाण्यासाठी घरातून निघाला, पण परत आला नाही,' असे संतोषने तक्रारीत म्हटले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी ८ वाजता अभिषेकने कुटुंबाशी फोनवर बोलताना आपण जमालपूरमध्ये मित्रांसोबत असल्याचे आणि दुपारपर्यंत परत येत असल्याचे सांगितले. त्यानंतर अभिषेकचा फोन बंद झाला आणि त्याच्याशी संपर्क साधण्याचे सर्व प्रयत्न अयशस्वी ठरले. शुक्रवारी रात्री पोलिसांनी अभिषेकचा मृतदेह एका प्लास्टिकच्या पोत्यात विचित्र अवस्थेत जप्त केला.मृतदेह वाळू आणि मातीने भरलेल्या प्लास्टिकच्या पोत्यात सापडला. त्याचे दोन्ही हात दोरीने बांधलेले होते, परंतु डोके आणि दोन्ही पाय गायब होते' असे भागलपूर सिटी एसपी शुभंक मिश्रा यांनी सांगितले. संतोषने दाखल केलेल्या बेपत्ता व्यक्तीच्या तक्रारीचे काही दिवसांतच खुनाच्या तपासात रूपांतर झाले.या तपासात तक्रारदार मामाच या क्रूर आणि सुनियोजित गुन्ह्याचा सूत्रधार असल्याचे उघड झाले. प्रेमसंबंध आणि ब्लॅकमेलिंगच्या संशयातून हा गुन्हा घडल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. रविवारी पोलिसांनी संतोषला अटक केली. एसपी मिश्रा यांनी सांगितले की, 'तो हल्ल्याचा मुख्य सूत्रधार असल्याचे आढळून आले.'अभिषेक मूळचा मक्सपूर गावचा रहिवासी होता आणि गेल्या चार वर्षांपासून तो आपल्या मामाच्या घरी नाथनगरमधील मस्कंद बराईपूर येथे राहत होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अभिषेक त्याच्या मामाच्या कापड व्यवसायात मदत करत असे.बेपत्ता व्यक्तीची तक्रार मिळाल्यानंतर भागलपूर एसएसपीने सिटी एसपी आणि एसडीपीओ (सिटी-२) यांच्या पर्यवेक्षणाखाली जिल्हा गुप्तचर युनिटच्या तांत्रिक मदतीने एक विशेष तपास पथक (एसआयटी) तयार केले. तांत्रिक पुरावे, मोबाईल कॉल रेकॉर्ड आणि स्थानिक गुप्तचर माहितीच्या आधारे शुक्रवारी मिर्झापूर गावचे रहिवासी राधे कुमार मंडल आणि ऋतिक कुमार उर्फ रितेश या दोघांना अटक करण्यात आली.हे दोघेही अभिषेकचे मित्र होते आणि त्याच्या मामाच्या व्यवसायात त्याच्यासोबत काम करत होते. 'चौकशीदरम्यान, आरोपींनी सांगितले की अभिषेकला मांडीवर गोळी मारण्यात आली होती आणि त्याचा मृतदेह एका तलावात फेकून देण्यात आला होता,' असे एसपी मिश्रा यांनी सांगितले.

# भारतविरुद्ध न्यूझीलंड एकदिवसीय मालिकेसाठी संघ कधी जाहीर होणार?




**नवी दिल्ली :** टीम इंडिया २०२६ या वर्षाची सुरुवात एकदिवसीय मालिकेने करणार आहे. India vs New Zeland यांच्यातील तीन साम न्यांची एकदिवसीय मालिका ११ जानेवारीपासून सुरू होईल. भारताच्या एकदिवसीय संघाची घोषणा करण्याची तारीखही जाहीर करण्यात आली आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचा समावेश असलेला भारताचा एकदिवसीय संघ कधी जाहीर होणार ते जाणून घ्या...प्रकाशित झालेल्या वृत्तानुसार, बीसीसीआयच्या एका सूत्राने सांगितले की, अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखालील निवड समिती ३ जानेवारी रोजी बैठक घेईल, ज्यामध्ये भारताचा एकदिवसीय संघ जाहीर केला जाईल. टीम इंडियाने शेवटचा ६ डिसेंबर रोजी विशाखापट्टणमच्या मैदानावर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध एकदिवसीय सामना खेळला होता. आता, अगदी एका महिन्यानंतर, भारताचा एकदिवसीय संघ पुन्हा एकदा शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली खेळताना दिसेल. यापूर्वी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध एकदिवसीय मालिका रंगली ज्याचे नेतृत्व के एल राहुलने केले.रोहित शम नि टीम इंडियासाठी शेवटच्या एकदिवसीय सामन्यात ७५ धावा केल्या. त्यानंतर २०२५-२६ च्या विजय हजारे ट्रॉफी हंगामाच्या पहिल्या सामन्यात त्याने १५५ धावांची शानदार खेळी केली. आता, रोहित शर्मा न्यूझीलंडविरुद्ध त्याचा प्रभावी फॉर्म सुरू ठेवण्याचा प्रयत्न करेल. विराट कोहली देखील भरपूर धावा करत आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या मालिकेत त्याने दोन शतके झळकावली. त्यानंतर विजय हजारे ट्रॉफीमध्ये त्याने १३१ आणि ७७ धावा केल्या. कोहली आणि रोहित आता २०२७ च्या विश्वचषकासाठी पूर्णपणे तयार आणि तंदुरुस्त दिसत आहेत.आता भारतीय संघात स्थान मि ळवण्यासाठी अनेक लोक दावेदार असतील. एकदिवसीय मालिकेनंतर टी-२० मालिका खेळेल. तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका असणार आहे. यानंतर पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळतील. टी-२० साठी भारतीय संघ आधीच जाहीर झाला आहे. शुभमन गिलला संघात संधी मिळालेली नाही. न्यूझीलंडविरुद्ध टी-२० मालिकेसाठी जो संघ जाहीर झाला आहे तोच संघ टी-२० विश्वचषकासाठी ही खेळणार आहे.

## पाथिरानाने केकेआरमध्ये जाताच व्यक्त केली खंत

**मुंबई :** आयपीएल २०२६ च्या मेगा लिलावात विदेशी खेळाडूंनी बाजी मारली. केकेआरने कॅमरन ग्रीन आणि मथीशा पाथिराना या दोघांना तब्बल ४३ कोटी रुपयांना विकत घेतले. चेन्नई सुपर किंग्जम धून बाहेर पडलेल्या मथीशा पाथिराना याने एक भावनिक पोस्ट शेअर केली आहे. केकेआरने पथिरानाला १८ कोटी रुपयांमध्ये करारबद्ध केले आहे.पाथिरानाने आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, 'एक स्वप्न पाहणाऱ्या मुलापासून ते अभिमानाने पिवळी जर्सी घालण्यापर्यंत, सीएसकेने मला क्रिकेटपेक्षा खूप काही दिले. या संघाने मला विश्वास, आत्मविश्वास आणि एक कुटुंब दिले, जे मी नेहमी जपणार आहे. २०२२ ते २०२५ च्या अखेरपर्यंत, पिवळ्या जर्सीतील प्रत्येक क्षणाने मला एक क्रिकेटर आणि एक माणूस म्हणून घडवल्याचं पाथिरानाने म्हटलं आहे.मी नेहमीच सीएसकेसोबत माझा शेवटचा हंगाम एका खास पद्धतीने संपवू इच्छित होतो. शेवटपर्यंत माझे सर्वोत्तम देण्याची आणि या शानदार फ्रॅंचायझीसाठी ५० विकेट्स घेण्याची माझी इच्छा होती. दुर्दैवाने, मी ते करू शकलो नाही, पण हे



स्वप्न आणि प्रयत्न नेहमीच माझ्या हृदयात होते. मी धोनी भाईचे मार्गदर्शन आणि व्यवस्थापनाच्या विश्वासासाठी माझ्या टीममेट्सचे भावांसारखे माझ्या पाठीशी उभे राहण्यासाठी आणि प्रत्येक निष्ठावान सीएसके चाहत्याचे प्रत्येक चढ-उतारात म ला साथ दिल्याबद्दल मी नेहमीच आभारी राहीन. तुमचे प्रेम माझ्यासाठी सर्वस्व होते. चेन्नईचे माझ्या हृदयात नेहमीच एक खास स्थान राहील, असंही मथीशा पाथिराना म्हणाला.केकेआरसोबतच्या नव्या प्रवासाबद्दल बोलताना पाथिराना म्हणाला, 'चेन्नई नेहमीच घरासारखे वाटेल आणि पिवळा रंग नेहमीच माझ्या हृदयात एक खास जागा ठेवेल. आदर, कृतज्ञता आणि अभिमानाने, मी आता पान पलटतो आणि केकेआरसोबत एक नवीन अध्याय सुरू करतो. धन्यवाद सीएसक.'

## मुस्तफिजूर रहमानवर IPL खेळणार की नाही?

**मुंबई :** भारत आणि बांगलादेशमध्ये राजकीय परिस्थिती बिघडलेली पाहायला मिळत आहे. राजकीय वातावरण हे तापलेले दिसत आहे. या दोन्ही देशाच्या राजकीय वातावरणाचा परिणाम आता क्रिकेटवर होईल असे दिसत आहे. आयपीएलपूर्वी आता एक मुद्दा चर्चेचा विषय बनत आहे. बांगलादेशचा वेगवान गोलंदाज इंडियन प्रीमियर लीगमध्ये Kolkata Knight Riders खेळणार की नाही यावर बीसीसीआयने एक विधान केले आहे.२०२६च्या आयपीएलच्या मि नी-लिलावात मुस्तफिजूर रहमान हा एकम व बांगलादेशी खेळाडू ज्याच्यावर बोली लावली गेली. मुस्तफिजूरला कोलकाता नाईट रायडर्सने ९.२० कोटी रुपयांना विकत घेतले. लिलावानंतर, केकेआरला सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात टीकेला सामोरे जावे लागले, चाहते आणि काही राजकीय नेत्यांनी आयपीएलमध्ये बांगलादेशी खेळाडूंच्या सहभागावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.बीसीसीआयच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने इनसाइड स्पोर्टला सांगितले की, 'परिस्थिती संवेदनशील आहे. आम्ही सरकारशी सतत संपर्कात आहोत. सध्या बांगलादेशी खेळाडूंवर बंदी घालण्याची कोणतीही शक्यता नाही.

## २०२५ च्या अनुभवांची पोस्ट केली शेअर

**मुंबई :**क्रिकेटच्या मैदानावर मानधनाने उल्लेखनीय कामगिरी केली, तर तिचे वैयक्तिक जीवनात उलथापालथ झाली. तरीही स्मृती मानधना खचली नाही. मैदानावर तिने जोरदार कमबॅक केला. आता वर्ष संपत असताना २०२५ बद्दल स्मृतीने एक व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला.

मानधनाने तिच्या सोशल मीडियावर गेल्या वर्षाचा एक व्हिडिओ शेअर केला. व्हिडिओमध्ये तिच्या विश्वचषक विजयाच्या उत्सवाची झलक, कौटुंबिक क्षण आणि तिच्या फिटनेस दिनचर्येची झलक होती. व्हिडिओच्या शेवटी असलेल्या भगवद्गीतेतील एका ओळीने सर्वाधिक लक्ष वेधले. स्मृतीने व्हिडिओचा शेवट 'भगवद्गीतेचा १२ वा दिवस: तुमच्यासोबत खरोखर काही अद्भुत घडण्यापूर्वी सर्वकाही बिघडते. म्हणून फक्त वाट पहा, भगवान कृष्ण.'गेल्या वर्षी स्मृती मानधनासाठी तिच्या क्रिकेट कारकिर्दीच्या बाबतीत उल्लेखनीय होते. मानधनाने कसोटी, एकदिवसीय आणि टी-२० मध्ये एकूण १७०३ धावा केल्या. महिला क्रिकेटच्या इतिहासात एका कॅलेंडर वर्षात कोणत्याही फलंदाजाने केलेल्या या सर्वाधिक धावा आहेत. २०२४ मध्ये १६५९ धावांचा स्वतःचाच विक्रम मोडून तिने ही कामगिरी




केली. इतकेच नाही तर स्मृतीने १०,००० आंतरराष्ट्रीय धावाही पूर्ण केल्या. असे करणारी ती जगातील चौथी सर्वात जलद महिला फलंदाज ठरली. मिताली राजनंतर असे करणारी ती फक्त दुसरी भारतीय आहे. गेल्या वर्षी, मानधनाच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे भारतीय संघाला पहिल्यांदाच आयसीसी एकदिवसीय विश्वचषक जिंकण्यास मदत झाली.भारतीय संघ विश्वविजेता झाल्यानंतर, स्मृती मानधनाच्या वैयक्तिक आयुष्यात एक नवीन सुरुवात होणार होती. संगीतकार पलाश मुच्छलने डीवाय पाटील स्टेडियममध्ये तिला फिल्मी शैलीत प्रपोज केले. सर्व काही ठीक चालले होते. मानधन तिच्या लग्नाबद्दल खूप आनंदी होती, पण अचानक असे काही घडले ज्यामुळे तिचे स्वप्न एका झटक्यात मोडले. २३ नोव्हेंबर रोजी लग्नापूर्वी मानधनाच्या वडिलांची तब्येत बिघडली, यानंतर लग्न पुढे ढकलण्यात आले.

## अर्जुनवर गोलंदाजी बंद करण्याची का आली वेळ?

**जयपूर :** अर्जुन तेंडुलकरवर नामुष्कीची वेळ आल्याचे पाहायला मिळाले. कारण अर्जुन तेंडुलकरवर आपली गोलंदाजी बंद करण्याची वेळ आली. ही गोष्ट घडली ती विजय हझारे ट्रॉफीच्या सामन्यात. अर्जुन तेंडुलकर मुंबईविरुद्ध खेळत होता. पण या सामन्यात त्याची गोलंदाजी बंद करण्याची वेळ आली.अर्जुन तेंडुलकरने काही दिवसांपूर्वीच मुंबईच्या संघाला सोडचिठ्ठी दिली होती. त्याच मुंबईच्या संघाविरुद्ध अर्जुन तेंडुलकर आज मैदानात उतरला होता. मुंबईच्या संघाला अर्जुन तेंडुलकरची सर्व बलस्थानं माहिती होती, त्यामुळे या सामन्यात अर्जुन तेंडुलकर पुरता अपयशी ठरेल, असे सर्वांना वाटत होते आणि हेच या सामन्यात घडल्याचे सर्वांना पाहायला मिळाले.अर्जुन तेंडुलकर मुंबईला सोडून गोव्याच्या संघात दाखल झाला होता. अर्जुनने काही सामन्यांत चांगली कामगिरी केली होती. पण सर्वांचे लक्ष या सामन्यात अर्जुन कशी कामगिरी करतो, यावर होते. कारण यापूर्वी अर्जुन हा मुंबईच्या संघाकडून खेळला होता. त्यामुळे त्याची गोलंदाजी आणि फलंदाजी मुंबईच्या खेळाडूंना चांगलीच माहिती होती. या सामन्यात अर्जुनने गोव्याच्या गोलंदाजीचे सारथ्य केले. अर्जुनने यावेळी मुंबईविरुद्ध पहिले षटक टाकले. पण अर्जुनला यावेळी सूर गवसला नाही. अर्जुनला या सामन्यात फक्त आठच षटके गोलंदाजी करायला दिली, बाकीची दोन षटके त्याला गोलंदाजी करण्यासाठी दिलीच नाहीत. या आठ षटकांत अर्जुनने तब्बल ७८ धावा दिल्या होत्या, त्यामुळे त्याची गोलंदाजी यावेळी बंद करावी लागल्याचे पाहायला मिळाले. मुंबईच्या संघाची प्रथम फलंदाजी होती. सर्फराझ खानने यावेळी १५७ धावांची खेळी साकारली.

त्यामुळे मुंबईच्या संघाला यावेळी ४४४ धावांचा डोंगर उभारता आला. मुंबईच्या आव्हानापुढे गोव्याचा संघ लवकर बाद होईल, असे सर्वांना वाटत होते. पण त्याचवेळी अर्जुन तेंडुलकर सलामीला आला आणि त्याने संघाला चांगली सुरुवात करून दिली.अर्जुन म बईपुढे फलंदाजीत पुरता अपयशी ठरले, असे सर्वांना वाटत होते, पण अर्जुनने यावेळी धमाकेदार फटकेबाजी करत पाच चौकार लगावले आणि गोव्याच्या संघाचा चांगली सुरुवात करून दिली. गोव्याच्या संघाची सुरुवात महत्वाची होती. कारण त्यांना मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करायचा होता. अर्जुनने यावेळी पाच चौकारांच्या जोरावर २४ धावा करत संघाला चांगली सुरुवात करून दिली. गोव्याने या सुरुवातीनंतर मुंबईच्या संघाला चांगली लढत दिली. गोव्याचा संघ ३५० धावांच्या पार पोहोचला होता.मुंबईच्या संघाला सोडून अर्जुन तेंडुलकर गोव्याच्या संघात गेला होता, पण मुंबईच्या संघाविरुद्ध खेळताना त्याला चांगली कामगिरी करता आली नसल्याचे पाहायला मिळाले.



# दोन भाषांमध्ये येणार आगामी नाटक, पुनरागमनात सांभाळतोय दुहेरी जबाबदारी..

**मुंबई :** मराठी रंगभूमीवर सध्या नव्या प्रयोगांची आणि महत्त्वाच्या कलाकारांच्या पुनरागमनाची चर्चा रंगली आहे. या यादीमध्ये आता अभिनेता सिद्धार्थ जाधव याचंही नाव प्रामुख्यानं घेता येईल. सिद्धार्थ आठ वर्षांनंतर 'ॲनिमल' या नाटकाच्या माध्यमातून रंगमंचावर परतत आहे. यावेळी तो फक्त अभिनेता नसून, निर्मात्याच्या भूमिकेतही असणार आहे. विशेष म्हणजे मराठी आणि हिंदी अशा दोन्ही रंगभूमीवर तो प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.आईवडिलांच्या नावानं सिद्धार्थनं सुरू केलेल्या 'ताराराम' या निर्मिती संस्थेची ही पहिलीच निर्मिती असणार आहे. तसंच नाटकाच्या हिंदी आवृत्तीची निर्मिती 'एजीपी वर्ल्ड' या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने होणार आहे. नाटकाविषयी लेखक-दिग्दर्शक महेश मांजरेकर म्हणाले, 'हे नाटक गोष्ट सांगत नाही, तर एक अनुभव देतं. 'ॲनिमल' हे नाटक एका व्यक्तीपुरतं नसून, स्वप्नं घडवणाऱ्या-मोडणाऱ्या व्यवस्थेत अडकलेल्या आणि





हळूहळू एकटा पडत स्वतःशी झुंज देणाऱ्या स्ट्रगलरचा प्रवास आहे. हा प्रवास कोणतीही ठरावीक चौकट न आखता घडतो. सिद्धार्थ जाधव या भूमिकेशी पूर्णपणे एकरूप होतो आणि प्रेक्षक फक्त नाटक पाहत नाहीत ते त्या अस्वस्थ प्रवासाचा भाग बनतात. नाटकात शहराची घाई, स्पर्धेची धार, स्वप्नांची झीज आणि वाढता मानसिक ताण या सगळ्यांचा प्रवास एका एकट्या माणसाच्या आत उलगडतो.'तर सिद्धार्थने अशी प्रतिक्रिया दिली की, ॲनिमल या नाटकाम ुळेमाझ्यातली कलाकार म्हणून असलेली क्षमता मला तपासून पाहता येते. महेश मांजरेकर यांनी दाखवलेला विश्वास आणि वेगवेगळ्या भूमिका जगण्याची दिलेली संधी माझ्यासाठी अमूल्य आहे. आई-वडिलांच्या नावानं निर्मिती संस्था सुरू करण्याचं स्वप्न मनात होतंच; 'ताराराम'ची सुरुवात या नाटकापासून होत आहे; म्हणून हा प्रवास माझ्यासाठी खास आहे.'आजवर विविध शैलींमध्ये ठसा उमटवलेला कलाकार म्हणून, सिध्दार्थ जाधव या नाटकातअधिक संयत, गंभीर आणि अंतर्मुख रूपात दिसणार आहे. सध्या नाटकाची जोरदार तालमी सुरू आहे. लवकरच हे नाटक रंगभूमीवर सादर होणार आहे.

## हॅप्पी न्यू इयर करायला यायलाच लागतंय', निलेश साबळेच्या पोस्टने वेधलं लक्ष

**मुंबई :** डॉ.निलेश साबळे आणि भाऊ कदम या विनोदवीरांनी काही दिवसांपूर्वी झी मराठीवर दमदार पुनरागमन केले. त्याआधी अनेक दिवस सोशल मीडियावर त्यांच्या 'आता कमबॅक होणार' या वाक्याची चर्चा होती. 'उगाच अवॉर्ड्स' हा कार्यक्रम झी मराठीवर अलिकडेच प्रदर्शित झाला. या कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी या कलाकारांनी सांभाळलेली. आता निलेशने सोशल मीडियावर आणखी एक पोस्ट शेअर करत त्याच्या आगामी प्रोजेक्टविषयी संकेत दिले आहेत.



निलेश-भाऊने झी मराठीवर वाहिनीवर कमबॅक केल्याची विशेष चर्चा झाली, कारण अलिकडेच निरोप घेतलेल्या 'चला हवा येऊ द्या'च्या लेटेस्ट पर्वात ते दोघे नव्हते. जवळपास एक दशक उकधऊ चा चेहरा असलेले हे कलाकार या कार्यक्रमात न झळकल्याने, प्रेक्षकांच्या भुवया उंचावल्या. त्यानंतर दोघेही झी मराठी सोडून इतर वाहिन्यांवरील कार्यक्रमात झळकले होते. त्यामुळे २०२५ च्या अखेरीच झालेले त्यांचे पुनरागमन प्रेक्षकांसाठी खास होते. आता त्याने नववर्षाच्या निमित्ताने शेअर केलेली पोस्ट प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेणारी ठरली१ जानेवारी २०२६ रोजी निलेशने शेअर केलेल्या पोस्टमध्ये त्याने लिहिले की, 'हॅप्पी न्यू इयर करायला यायलाचं लागतंय! नवीन वर्षाच्या सगळ्यांना मनापासून शुभेच्छा. या वर्षात तुमच्या चेहऱ्यावरचं हास्य द्विगुणीत करण्याची जबाबदारी आमची.' निलेश त्याच्या कोणत्या आगामी प्रोजेक्टविषयी बोलतोय की, त्याने ही पोस्ट सहजच केलेली आहे, हे यातून स्पष्ट झालेले नाही. त्याने शेअर केलेल्या पोस्टवर चाहत्यांनी कमेंट करत नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.दरम्यान झी मराठीच्या ' चला हवा येऊ द्या ' कार्यक्रमाने निरोप घेतल्यानंतर निलेश आणि भाऊ कलर्स मराठीवरील 'हसताय ना, हसायलाच पाहिजे' या शोमध्ये झळकले होते.

## समृद्धी केळकरचं नव्या भूमिकेत झळकणार

**मुंबई :** 'हळद रुसली कुंकू हसलं' फेम लोकप्रिय अभिनेत्री समृद्धी केळकर एका नव्या भूमि केतून पुन्हा एकदा आपल्या चाहत्यांना भुरळ घालण्यासाठी सज्ज झाली आहे. 'फिलमबाझ' फिल्म कंपनी आणि समृद्धी केळकर हे समीकरण प्रेक्षकांसाठी नेहमीच खास राहिलं आहे. आता तब्बल ३ वर्षांच्या दीर्घ प्रतीक्षेनंतर ही जोडी एका नव्या शॉर्ट फिल्मसाठी एकत्र आली आहे, जिचं नाव आहे ' तुम बिन जाऊँ कहाँ '. या घोषणेमुळे समृद्धीच्या चाहत्यांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.या शॉर्ट फिल्मच्या निमित्ताने दिग्दर्शक कृणाल राणे देखील २ वर्षांनंतर आपल्या चॅनेलसाठी पुन्हा एकदा लेखन आणि दिग्दर्शनाची धुरा सांभाळत आहेत. समृद्धीने याआधी त्यांच्या 'दोन कटिंग' या सीरिजमधून प्रेक्षकांची मनं जिंकली होती. आता पुन्हा एकदा हाच करिष्मा पडद्यावर पाहण्याची उत्सुकता वाढली आहे.



## 'त्यामुळे स्वत:ला सावरण्यास मदत झाली'

### २०२५ मधील लढायांविषयी प्राजक्ता माळीची भावनिक

**मुंबई :** अभिनेत्री प्राजक्ता मळी सोशल मीडियावरही चर्चेत असते. कधी तिच्या प्रोजेक्टम ुळे तर कधी फोटोशूटमुळे तिची चर्चा होते. अलिकडेच अभिनेत्रीने गेल्या वर्षातील निवडक फोटोंचा खास व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला. अभिनेत्रीच्या या पोस्टवरही चाहत्यांनी कम ेंटचा वर्षाव केला. २०२५ ला निरोप देताना आणि २०२६ या नवीन वर्षाचे स्वागत करताना तिने ही पोस्ट शेअर केली. सरलेलं वर्ष तिच्यासाठी कसं गेलं आणि नवीन वर्षाकडून काय अपेक्षा आहेत, याविषयी तिने पोस्ट शेअर केली. चाहत्यांनीही कमेंट करत तिला नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.प्राजक्ताने ही पोस्ट शेअर करताना तिचे या वर्षातील फोटोशूट, बारा ज्योतिर्लिंग यात्रेदरम्यानचे काही क्षण आणि कुटुंबियांसोबतचे फोटो शेअर केले आहेत. शिवाय तिचे प्रोजेक्ट आणि आर्ट ऑफ लिव्हिंगचे तिच्या आयुष्यात असणारे महत्व, याचीही झलक या व्हिडिओमध्ये पाहायला मिळाली. प्राजक्ताने हा व्हिडिओ शेअर करताना असे कॅप्शन दिले, 'हे वर्ष आत्मोपचार, आव्हानांना सामोरे जाणे, झालेले कौतुक आणि इतरही अशा अनेक गोष्टींबद्दल होते, ज्या शब्दांत व्यक्त केल्या जाऊ शकत नाहीत. मी कायम या गोष्टीवर विश्वास ठेवला आहे की, जे काही घडतं ते चांगल्यासाठीच घडतं आणि शेवटी सत्याचाच विजय होतो.'तिने पुढे लिहिले, 'या विचारांमुळे मी शांत आणि हसतमुख राहू शकले. अर्थात, आर्ट ऑफ लिव्हिंगच्या ३ नवीन कोर्सेसमुळे मला स्वतः ला सावरण्यास मदत झाली. मला एक लढवय्या म्हणून ओळखले जाणे आवडेल आणि मी २०२६ मध्येही माझ्या लढाया लढेन. मनात असणाऱ्या कृतज्ञतेसह २०२६ मध्ये भेटूया.' नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला अभिनेत्रीने शेअर केलेल्या पोस्टवर चाहत्यांसह कलाविश्वातील मंडळींनी तिला नवीन वर्षाच्या शुभेच्छा देणाऱ्या पोस्ट केल्या आहेत. तसेच अभिनेत्रीच्या वर्कफ्रंटबद्दल सांगायचे झाल्यास, ती

५

जानेवारीपासून सुरू होणाऱ्या 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'च्या नव्या पर्वातून पुन्हा भेटीला येणार आहे. तसेच यावर्षी तिची 'देवखेळ' ही सीरिजही रीलिज होईल.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# नॉट आऊट १०६! बुलढाण्याच्या नानींच्या दीर्घायुष्याचे गुपित; आजही कडुनिंबाच्या काडीने घासतात दात

**जनसंचलन/ जानेफळ**

आजच्या धावपळीच्या युगात जिथे सत्तरी गाठणे कठीण झाले आहे, तिथे बुलढाणा जिल्ह्यातील मोहना बुद्रुक (ता. मेहकर) येथील रामीबाई गोबरा चव्हाण यांनी वयाची १०६ वर्षे पूर्ण करून सर्वांसमोर एक नवा आदर्श ठेवला आहे. वयाचे शतक पार केल्यानंतरही नानी पूर्णपणे निरोगी आणि ठणठणीत असून, त्यांच्या या सुपर हिट इनिंगचे गुपित त्यांच्या साध्या आणि नैसर्गिक जीवनशैलीत दडलेले आहे.

नैसर्गिक जीवनशैली: आरोग्याची खरी गुरुकिल्ली आधुनिक काळात टूथपेस्ट आणि ब्रशचा वापर अनिवार्य झाला असताना, १०६ वर्षांच्या नानी मात्र आजही सकाळी कडुनिंबाच्या काडीने दात घासतात. हेच त्यांच्या मजबूत दातांचे आणि हिरड्यांचे रहस्य असल्याचे त्या अभिमानाने सांगतात. केवळ बाह्यच नव्हे, तर शरीराच्या अंतर्गत स्वच्छतेसाठी त्या दररोज सकाळी कडुनिंबाच्या पाल्याचा रस पितात. निसर्गातील या कडवट औषधी वनस्पतीचा वापरच त्यांना आजारांपासून दूर ठेवत आहे.

तरुणांसाठी ठरतायत प्रेरणा १०६ व्या वर्षात पदार्पण करूनही नानी कोणावरही अवलंबून नाहीत. त्या आपली स्वतःची कामे आजही उत्साहाने करतात. निसर्गाशी जोडलेली नाळ आणि घरगुती नैसर्गिक उपायांवरील अढळ विश्वास या जोरावर त्यांनी हे निरोगी आयुष्य कमावले आहे. आजच्या पिढीसाठी नानींचा हा जीवनप्रवास खरोखरच प्रेरणादायी आहे.

वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव नानींच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या कुटुंबीयांनी मोठा उत्साह साजरा




केला. नानींचे आशीर्वाद आणि मार्गदर्शन आमच्या पाठीशी असेच कायम राहावे, अशी भावना त्यांच्या कुटुंबीयांनी व्यक्त केली. नानींच्या या दीर्घायुष्याची आणि त्यांच्या नैसर्गिक सवयींची चर्चा आता संपूर्ण जिल्ह्यात होत असून, त्यांच्यावर सर्वच स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# तालुका कृषी कार्यालय नांदुरा येथे ठिय्या आंदोलन

**जनसंचलन/ नांदुरा**

नांदुरा तालुक्यातील चांदुर बिस्वा महसूल मंडळामध्ये सप्टेंबर महिन्यामध्ये अतिवृष्टी झाल्याने उडीद मुंग ज्वारी सोयाबीन तूर कापूस पिकांचे अतोनात नुकसान झाल्याने सोयाबीन एकरी एक क्विंटल उत्पन्न झाल्याने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सन २०२५ खरीप हंगाम पंतप्रधान पिक विमा शेतकऱ्याच्या खात्यामध्ये जमा काढण्यासाठी नांदुरा तालुका कृषी कार्यालयात चादुर बिस्वा येथील अंबिका फाउंडेशनचे अध्यक्ष अभय संतोषराव पाटील यांच्या नेतृत्वामध्ये ठिय्या आंदोलन करण्यात आले . तालुका पिक विमा प्रतिनिधी कुंदन सोळंकी यांनी लेखी पत्र देऊन पत्रामध्ये सन २०२५ -२६ खरीप




हंगामातील पिक विमा चांदुर बिस्वा महसूल मंडळामध्ये पीक कापणी प्रयोग आधारित निश्चित करण्यात येईल या संदर्भात खरीप हंगाम २०२५- २६ पिक विमा मंजूर करण्यात येईल पॉलिसी रिजेक्ट झालेल्या शेतकऱ्यांची अपुर्वल प्रक्रिया वरिष्ठ स्तरावर सुरू असून असे पत्र अभय पाटील देण्यात आले शेतकऱ्यांनी आंदोलन स्थगित केले.

# ५ जानेवारीला जिल्हास्तरीय लोकशाही दिन...

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी, गाऱ्हाणी व अडचणींचे निरसन करण्यासाठी सोमवार दि. ५ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित करण्यात आले आहे. अर्जदारांनी अर्ज करतांना स्विकृतीचे निकष : अर्ज विहीत नमुन्यात केलेला असावा, तक्रार/निवेदन वैयक्तीक स्वरुपाची असावी, चारही स्तरांवरील लोकशाही दिनाकरीता अर्जदाराने अर्ज विहीत नमून्यात १५ दिवस आधी २ प्रतीत पाठविणे आवश्यक राहील, तालुका लोकशाही दिनानंतर १ माहिन्यांने जिल्हाधिकारी लोकशाही दिनात अर्ज करता येईल, जिल्हाधिकारी लोकशाही दिनानंतर दोन माहिन्यांनी विभागीय आयुक्त लोकशाही दिनात व विभागीय आयुक्त लोकशाही दिनानंतर दोन माहिन्यांनी मंत्रालय लोकशाही दिनात अर्ज सादर करता येईल. अर्ज स्विकारले जाणार नाहीत : न्याय प्रविष्ट प्रकरणे, राजस्व अपिल्स, सेवा व आस्थापना विषयक बाबी, विहीत नमून्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज, अंतिम उत्तर दिलेले आहे/देण्यात येणार आहे अशा प्रकरणांत पून्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्ज, तक्रार/निवेदन वैयक्तीक स्वरुपाची नसेल तर, वरील प्रमाणे जे अर्ज लोकशाही दिनाकरीता स्विकृत करता येऊ शकत नाहीत असे अर्ज सामान्य तक्रार या स्वरुपात संबंधित विभागांकडे आवश्यक कारवाईसाठी पाठविण्यात येणार आहे, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हाळे यांनी दिली आहे.




# यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कारासाठी प्रवेशिकांचे आवाहन; 30 जानेवारीपर्यंत मुदत...




**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने दिला जाणारा स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार २०२५ साठी लेखक आणि प्रकाशकांकडून प्रवेशिका मागविण्यात आल्या आहेत. १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत प्रकाशित झालेल्या प्रथम आवृत्तीच्या पुस्तकांसाठी ही स्पर्धा असून, पात्र साहित्यिकांनी आपल्या प्रवेशिका ३० जानेवारीपर्यंत सादर कराव्यात, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे यांनी केले आहे. या योजनेअंतर्गत सन २०२५ च्या पुरस्कारांसाठी प्रवेशिका सादर करण्याचा कालावधी १ जानेवारी २०२६ ते ३० जानेवारी २०२६ असा निश्चित करण्यात आला आहे. बुलढाणा जिल्ह्यातील इच्छुकांनी आपल्या प्रवेशिका आणि पुस्तके या विहित कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे जमा करणे आवश्यक आहे. विहित कालावधीनंतर प्राप्त होणाऱ्या प्रवेशिकांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर नवीन संदेश या सदरात स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार २०२५ नियमावली व प्रवेशिका या शीर्षाखाली व 'What's ne या सदरात 'Late Yashwantrao Chavan State Literature Award 2025 Rules Book and Application Form या शीर्षाखाली व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या http://sahitya.marathi.gov.in या संकेतस्थळावर प्रवेशिका व नियमपुस्तिका उपलब्ध आहे.

# शिवसेनेच्या स्टार प्रचारक यादीत आमदार सिद्धार्थ खरात मेहकरचा दबदबा थेट राज्यपातळीवर!

जनसंचलन/मेहकर

आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या रणधुमाळीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने आक्रमक पाऊल टाकत ४० जणांची स्टार प्रचारकांची यादी राज्य निवडणूक आयोगाकडे सादर केली असून, या यादीत मेहकरचे कर्तृत्ववान आमदार सिद्धार्थ खरात यांचा समावेश करण्यात आला आहे. हा निर्णय म्हणजे मेहकरच्या राजकारणावर शिवसेनेची ठसठशीत मोहोर असून, स्थानिक नेतृत्वाला मिळालेली मोठी मान्यता आहे. नुकत्याच पार पडलेल्या मेहकर नगरपालिका निवडणुकीत आमदार सिद्धार्थ खरात यांच्या धडाकेबाज नेतृत्वाखाली शिवसेनेने विरोधकांचा सुपडा साफ केला. अचूक रणनीती, प्रभावी नियोजन आणि कार्यकर्त्यांमध्ये निर्माण केलेली ऊर्जा यामुळे शिवसेनेचा भगवा थेट मेहकर नगरपालिकेवर फडकला. शहरप्रमुख किशोर भास्करराव


SHIVSENA | CENTRAL OFFICE
(UDDHAV BALASAHEB THACKERAY)
Shivsena Bhavan : 1st Floor, Ram Ganesh Gadkari Chowk, Dadar, Mumbai - 400 028
Tel : 022-35243434 / 35243456
Shivalaya, Sampark Karyalaya : Madam Kama Road, Nariman Point, Mumbai - 400 021
Tel : 022-2288 3434 / 2288 5050
Email : shivsenabhavan@gmail.com • Website : www.shivsena.in

LOCAL SELF GOVERNMENT ELECTION TO MAHANAGARPALIKA ELECTION-2025-26
LIST OF 40 SHIVSENA LEADERS (AS REQUIRED BY STATE ELECTION COMMISSION, MAHARASHTRA) WHO WILL TOUR STATE OF MAHARASHTRA FOR ELECTION CAMPAIGNING.

01. Shri.Uddhavji Balasaheb Thackeray, Shivsena Pakshapramukh
02. Shri.Aditya Thackeray, Shivsena Leader, Yuva Sena President
03. Shri.Subhash Desai
04. Shri.Sanjay Raut
05. Shri.Anant Geete
06. Shri.Chandrakant Khaire
07. Shri.Arvind Sawant
08. Shri.Bhaskar Jadhav
09. Shri.Anil Desai
10. Shri.Vinayak Raut
11. Adv. Anil Parab
12. Shri.Rajan Vichare
13. Shri.Sunil Prabhu
14. Shri.Adesh Bandekar
15. Shri.Varun Sardesai
16. Shri.Ambadas Danve
17. Shri.Ravindra Mirlekar
18. Shri.Nitin Banugade Patil
19. Shri.Rajkumar Bafna
20. Smt.Priyanka Chaturvedi
21. Shri.Sachin Ahir
22. Shri.Laxman Wadle
23. Shri.Manoj Jamsutkar
24. Shri.Nitin Deshmukh
25. Smt.Sushama Andhare
26. Shri.Sanjay (Bandu) Jadhav
27. Smt.Jyoti Thakare
28. Smt.Jayshree Shelke
29. Smt.Janhavi Sawant
30. Shri.Sharad Koli
31. Shri.Omraje Nimbalkar
32. Shri.Sunil Shinde
33. Shri.Haroon Khan
34. Shri.Siddharth Kharat
35. Shri.Vaibhav Naik
36. Shri.Anand Dube
37. Shri.Ashok Tiwari
38. Shri.Ram Salgaonkar
39. Smt.Priyanka Joshi
40. Shri.Anish Gadhave

...2...

गारोळे यांची नगराध्यक्षपदी निवड होऊन शिवसेनेने सत्ता काबीज करत आपली ताकद दाखवून दिली. या दणदणीत यशाची दखल घेत पक्ष नेतृत्वाने आमदार खरात यांच्यावर थेट राज्यस्तरीय प्रचाराची जबाबदारी सोपवली आहे. ही निवड म्हणजे त्यांच्या नेतृत्वगुणांवर आणि विजयाची खात्री देणाऱ्या कार्यशैलीवर शिक्कामोर्तब आहे. स्टार प्रचारक यादीतील समावेशाची बातमी मिळताच मेहकरमध्ये शिवसैनिकांमध्ये जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले. या निर्णयामुळे मेहकरचा राजकीय दबदबा वाढला असून, आगामी महानगरपालिका निवडणुकांमध्ये शिवसेना आक्रमक विजयाकडे वाटचाल करेल, असा ठाम विश्वास व्यक्त केला जात आहे.

# शेतकऱ्याच्या गोठ्यात बिबट्यांचे कुटुंब!

## बिबट्यांचा बंदोबस्त केव्हा?

## दुधाकलंबेश्वरमध्ये भीतीचं साम्राज्य

जनसंचलन/हिवरा आश्रम

परिसरातील दुधाकळंबेश्वर शिवारात बुधवारी सकाळी घडलेल्या घटनेने संपूर्ण परिसरात दहशत पसरली आहे. थेट शेतातील गोठ्यात दोन बिबटे आणि त्यांच्यासोबत पिल्ले आढळल्याने शेतकऱ्यांची झोप उडाली आहे. दुधाकळंबेश्वर रस्त्यालगत सुभाष खुरद यांच्या शेतातील गोठ्यात सकाळी सुमारे ८ वाजता दोन बिबटे निघताना दिसले. विशेष म्हणजे, त्यापैकी एका बिबट्याच्या तोंडात पिल्लू असल्याचे दृश्य शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष पाहिले. ही दृश्ये अंगावर काटा आणणारी होती. बिबटे पसार झाल्यानंतर शेतकऱ्यांनी गोठ्याची तपासणी केली असता, आतच आणखी एक बिबट्याचे पिल्लू आढळून आले. त्यामुळे शिवारात भीतीचे वातावरण अधिकच गडद झाले आहे. शेतात काम करणारे मजूर, महिलांसह नागरिकांमध्ये प्रचंड घबराट पसरली आहे. घटनेची माहिती मिळताच वन विभागाची संपूर्ण यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाली. सहायक वनसंरक्षक वैभव काकडे व घाटबोरीचे वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. दरम्यान, बिबट्यांचा तात्काळ बंदोबस्त करण्याची जोरदार मागणी होत असून, तोपर्यंत रात्रीचा विद्युत पुरवठा सुरू ठेवावा, अशी मागणी सरपंच विद्या सुभाष खुरद यांनी केली आहे. बिबट्यांचा वावर वाढत असताना प्रशासन किती सतर्क आहे, हा प्रश्न मात्र ऐरणीवर आला आहे.

# स्किल एक्यूपंक्चर, पॅरामेडिकल कॉलेज व हॉस्पिटल बुलढाणा येथे महापरिनिर्वाण दिन साजरा....

जनसंचलन/ बुलढाणा

दिनांक ६ डिसेंबर २०२५ रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर सचिन सुपे सर यांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेस अभिवादन व स्मृति पूजन केले यावेळी स्किल अबॅकस कंपनीच्या डायरेक्टर डॉक्टर छाया कंकाळ जीवणे, प्राध्यापक संजय सोनोने, प्राध्यापक उमेश साळवे, प्राध्यापिका प्रतिभा जाधव, प्राध्यापिका प्रियंका साळवे, श्री गजानन कंकाळ, प्राध्यापक शुभम सुरडकर, प्राध्या. कोमल लटके,श्री दिगंबर खंडागळे, मेघा मॅडम, भूषण बैरागी, लक्ष्मी ढोके आणि विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित राहून महामानवाला आदरांजली अर्पण केली. आपल्या भाषणामध्ये डॉक्टर सचिन सुपे सर यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी समता आणि बंधुता यांची त्यांनी दिलेली मूल्ये आजही तितकीच महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले, विद्यार्थ्यांनी या दिवशी पुस्तके घेऊन अभ्यास केला असता तर खऱ्या अर्थाने बाबासाहेबांना श्रद्धांजली अर्पण झाली असती हे मोलाचे विचार डॉक्टर सुपे सर यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडले. तसेच आपल्या भाषणामध्ये डॉक्टर छाया कंकाळ जीवने यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याचा आढावा घेतला तसेच त्यांनी संविधान निर्मितीतील आंबेडकरांचे मोलाचे योगदान, सामाजिक न्यायाची त्यांची भूमिका हे विचार त्यांनी मांडले. प्राध्यापक साळवे सर यांनी आपल्या भाषणातून वाचाल तर वाचाल या उक्तीप्रमाणे विद्यार्थ्यांनी वागावे, समाजातील दुर्बल व आणि वंचित शोषित घटकांना उभारी देण्याचे बाबासाहेबांचे कार्य आपल्या पिढीसाठी दीपस्तंभ आहे तसेच बाबासाहेबांनी आपल्याला दिलेले सर्वात मोठी देणगी म्हणजे भारतीय संविधान समानता, स्वातंत्र्य,बंधुता आणि न्याय यांचा पाया त्यांनी घातला. समाजातील शेवटच्या माणसापर्यंत हक्क पोहोचवण्याची ताकद त्यांच्या विचारात होती. प्राध्यापक साळवे सरांनी त्यांच्या भाषणात त्यांनी सांगितले की संविधान हे प्रत्येक विद्यार्थ्यांनी वाचले पाहिजे म्हणजेच बाबासाहेबांना खऱ्या अर्थाने महामानवाला महापरिनिर्वाणदिनी



अभिवादन स्वीकारले जाईल. तसेच विद्यार्थ्यांनी सुद्धा आपल्या भाषणातून बाबासाहेबांच्या आठवणींवर उजाळा दिला. बाबासाहेबांचे विचार... शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा हे विचार आजच्या पिढीसाठी आवश्यक आहेत, शिक्षणाशिवाय प्रगती अशक्य आहे हेच विचार विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून प्रकर्षाने मांडले. आजच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन प्राध्यापिका प्रियंका साळवे यांनी केले.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते वनपट्ट्यांचे वाटप

जनसंचलन/बुलढाणा

जळगाव जामोद तालुक्यातील मौजे भिंगारा येथील मंजूर झालेल्या ३१ वैयक्तिक वनपट्ट्यांचे वाटप बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडले. हे वनपट्टे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते संबंधित वनपट्टाधारक लाभार्थ्यांना प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमास अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे, उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड, उपविभागीय अधिकारी शैलेश काळे, प्रा. संजय खडसे यांच्यासह संबंधित अधिकारी व लाभार्थी उपस्थित होते. वनहक्क कायद्यांतर्गत लाभार्थ्यांना हक्काचे वनपट्टे प्राप्त झाल्याने त्यांच्या उपजीविकेला बळ मिळणार असल्याचे मत यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

